पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- ०२/०३/२०२१**

| पो.स्टे /अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटनाता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| १) आरमोरी अप.क्र.६२/२०२१ कलम ६५(अ),८३,९८(क) महा.दारुबंदी अधि. | मौजा आरमोरी ते गडचिरोली रोड कृषी उत्पन्न बाजार समिती नाका. **घटनाता. वेळ** :- दि.०२/०३/२०२१ चे ००.४५ वा ते ०२.३५ दरम्याण | फिर्यादी सरकारतर्फे सफौ/७८७ दादाजी मंगरुजी करकाडे नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली **आरोपीतांचे नाव** :- पाहिजे आरोपी १) आशिष पांडुरंग परशुरामकर रा. पिंपळगाव/कोहळी ता. लाखांदुर जि. भंडारा २) अज्ञात वाहन चालक |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैधदारु मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरुन | सफौ/७८७ दादाजी करकाडे, पोहवा/१८५० निलकंठ पेंन्दाम, नापोशि/२३९१ शुक्रचारी गवई, पोशि/५३५४ सुनिल पुठ्ठावार, पोशि/३४६७ मंगेश राउुत, चानापोशि/२५४१ शेषराज नैताम, | |

गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्री तसेच बेकायदेशीर दारु वाहतुकीस आळा बसण्याकरीता मा.श्री. अंकित गोयल, पोलीस अधिक्षक गडचिरोली, मा.श्री. समीर शेख अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु–जुगार व ईतर अवैध व्यवसायांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना, दिनांक ०२.०३.२०२१ रोजी किटसाहीत्य, शासकिय लॉपटॉप व प्रिंटर सोबत घेवुन शासकिय वाहन क्रमांक एम.एच. ३३ सी - ०३८५ ने गडचिरोली येथुन रवाना होउन मौजा आरमोरी परिसरात प्रोरेड गस्त करीत असतांना मुखबीरद्धारे खबर मिळाली कि, मौजा पिंपळगाव येथील नामे आशिष परशुरामकर व त्याचा सोबती वाहन चालक हे चारचाकी वाहन क्रमांक महाराष्ट्र ०४ ई एच -४७७४ मारुती सुझुकी रिट्झ या वाहनात लाखांदुर येथुन भरुन आरमोरी मार्गे गडचिरोली येथील चिल्लर दारु विक्रेत्यांना पुरवठा करणेकामी निघाला आहे अशा खबरेवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी सा. गडचिरोली यांना माहीती देवुन यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील वरील नमुद पोलीस पथक हे मौजा आरमोरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे नाक्याजवळ पोहचुन आम्ही व पंच तसेच वरील नमुद पोस्टाफ असे मिळुन मौजा आरमोरी ते गडचिरोली जाणा-या रोडवरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नाक्याजवळ आपआपले अस्तीत्व लपवुन तात्पुरता अडथळा रोडवर लाउन लपुन बसलो असता अंदाजे ००.४५ वा चे दरम्यान एक चारचाकी वाहन आरमोरी कडुन गडचिरोली कडे येतांना दिसली. आम्ही रोडवर उभे होऊन हात दाखविला असता त्यांना आम्ही पोलीस असल्याचा संशय आल्याने वाहन चालकाने आपल्या ताब्यातील चारचाकी वाहन थांबवुन तिथुन दोन इसम पळुन जातांना दिसले. त्यापैकी एक इसम आशिष परशुरामकर असल्याचे आम्ही स्वता व पंचांनी ओळखले व त्यासोबतचा चारचाकी वाहन चालक हा अनोळखी असल्याने त्याचे नाव, गाव समजु शकले नाही. तरी आम्ही व सोबतचे पोस्टाफने त्यांचा

पाठलाग केला असता ते मिळुन आले नाहीत. सदर थांबलेल्या चारचाकी वाहनाजवळ जाऊन पंचासमक्ष पाहणी केली असता सदर वर नमुद चारचाकी वाहनामध्ये खालीलप्रमाणे विदेशी दारु व बीअरचा मुद्देमाल मिळुन आला.
१) रॉयल स्टॅग बॅरेल व्हिस्की कंपनीच्या प्रत्येक नीप १८० मिली मापाच्या अश्या एकुण ४८ नग सीलबंद नीपा (एक पेटी) किंमत – १४,४००/- रुपये २) रॉयल स्टॅग डिलक्स व्हिस्की कंपनीच्या प्रत्येक नीप १८० मिली मापाच्या अश्या एकुण १४४ नग सीलबंद नीपा (तीन पेटया) किंमत – ४३,२००/- रुपये ३) रॉयल स्टॅग डिलक्स व्हिस्की कंपनीच्या प्रत्येक बॉटल ३७५ मिली मापाच्या अश्या एकुण २४ नग सीलबंद नीपा (एक पेटी) किंमत – १६,८००/- रुपये ४) ऑफीसर चॉईस प्रेस्टीज व्हिस्की कंपनीच्या प्रत्येक नीप ३७५ मिली मापाच्या अश्या एकुण २४ नग सीलबंद नीपा (एक पेटी) किंमत – १६,८००/- रुपये ५) इम्पेरीयल ब्ल्यु सुपेरीयर ग्रेन व्हिस्की कंपनीच्या प्रत्येक नीप १८० मिली मापाच्या अश्या एकुण ९६ नग सीलबंद नीपा (दोन पेटया) किंमत – २८,८००/- रुपये ६) टुबर्ग प्रिमीयम बीअर स्ट्रॉंग कंपनीच्या प्रत्येक टीन डब्बा ५०० मिली मापाचा अश्या एकुण ९६ नग बीअर टीन डब्बे (चार पेटया) किंमत – २८,८००/- रुपये व ७) विदेशी दारु व बीअरचा अवैध मुद्देमाल वाहतुक करणेकरीता वापरलेली एक कथ्या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची रिट्झ चारचाकी वाहन किंमत – ५,००,०००/- **असा एकुण ६,४८,८००/- रुपये किंमतीचा अवैध विदेशी दारु व बीअर व वाहनासह घटनास्थळावर मुद्देमाल** मिळुन आल्याने घटनास्थळावरुन जप्ती करुन गुन्हयातील आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशन आरमोरी येथे वरील नमुद कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर कारवाईमुळे अवैध धंदे करणा-या इसमांचे धाबे दणाणले आहेत.

